क्रमांक/मशा/का-२/गौखनि/सीआर-२२६३/२००९
विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय,
जुने सचिवालय (विस्तार इमारत) १ ला मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १६/०१/२०१०.

## :रेती / वाळू जाहीर लिलाव:

सर्व जनतेच्या माहितीसाठी जाहीर करण्यांत येते की, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील खाली नमूद केलेल्या रेतीगटांत उपलब्ध असलेल्या रेती / वाळू साठ्याचे उत्खनन / विक्री मोहोरबंद निविदा मागवून तसेच खुल्या लिलाव पद्धतीने अशी एकत्रित पद्धत अवलंबून दिनांक ५/१२/२००९ रोजी **विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, १ ला मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४** येथे, रेती गट क्रमांक १, २ आणि ३ बाबतची खाली नमूद केलेल्या रेती गटाच्या तपशिलातील लिलावाची प्रक्रिया उपरोक्त तारखेस अनुक्रमे **दुपारी १२.०० वाजता, दुपारी १३.०० व दुपारी १३.३० वाजता** आयोजित करण्यांत आली होती.

शासन महसूल व वन विभागाचे पत्र क्र.गौखनि-२७/२८/०९०८/प्र.क्र.४१५/ख, दिनांक ३.१२.२००९ चे पत्रान्वये तहकूब करण्यांत आले होते. आता मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ७/१/२०१० रोजीचे निर्देश व शासन, महसुल व वन विभागाकडील पत्र क्र.गौखनि-२८-२९/१०८९/प्र.क्र.३१५/ख, दिनांक १४.१.२०१० अन्वये सन २००९-२०१० अन्वये सदरचे लिलाव दिनांक **२८.१.२०१० रोजी** वर नमूद केलेल्या ठिकाणी व वेळी आयोजित करण्यांत येत आहे.

### रेती गटांचा तपशील

| अ.क्र | प्रमुख रेतीगट | रेती उत्खनन करावयाच्या क्षेत्राचा तपशील | उत्खननाची साधने | महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडील सर्वेक्षणानूसार उपलब्ध साठा (परिमाण ब्रासमध्ये) | उपलब्ध कालावधीकरीता उत्खननासाठी अनुज्ञेय साठा ब्रासमध्ये | हातची किमत रक्कम रुपये | निवीदेबावत भरावयाचा बयाणा रक्कम (रकाना ६ मधील रक्कमेच्या १०% प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ५अ | ६ | ७ |
| १ | रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील सावित्री नदी व बाणकोट खाडीचा संयुक्त रेतीगट | **गट क्र.१ उपगट :बाणकोट ते कुंबळेवाडी**<br>अ)बाणकोट ते शिपोळे-चार्ट क्र. ११२२/०९ वर दर्शविल्याप्रमाणे लांबी | १५.८ कि.मी. करीता १६ ड्रेझर्स | ३,२७,४९६ | ३,४६,३२० | १३,७४,८९,०४० | १,३७,४८,९०४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५.००कि.मी. x रुंदी १००मीटर x खोली १०मीटर | | ३,०४,४८५ | | | |
| | | ब)शिपोळे ते आडी-चार्ट क्र. ११३५/०९ वर दर्शविल्याप्रमाणे लांबी ५.७कि.मी. x रुंदी १००मीटर x खोली १०मीटर | | ४७,१०२ | | | |
| | | क)आडी ते कुंबळेवाडी-चार्ट क्र. ११३४/०९ वर दर्शविल्याप्रमाणे लांबी ५.१कि.मी. x रुंदी १००मीटर x खोली १०मीटर | | | | | |
| | | एकूण | १६ ड्रेझर्स | ६,७९,०८३ | ३,४६,३२० | १३,७४,८९,०४० | १,३७,४८,९०४ |
| २ | रायगड व रत्नागिरी जिल्हयातील सावित्री नदी व बाणकोट खाडीचा संयुक्त रेतीगट | गट क्र.२ उपगट :कुडगांव ते आंबेत (विचारेवाडी)<br><br>ड)कुडगाव ते पेवे -चार्ट क्र. ९२०/०७वर दर्शविल्याप्रमाणे लांबी ५.५ कि.मी. x रुंदी १००मीटर x खोली ९ मीटर | १०.७ कि.मी. करीता १० ड्रेझर्स | १,९५,९८८ | १,८५,००० | ७,३४,४५,००० | ७३,४४,५०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ई)पेवे ते आंबेत (विचारेवाडी) चार्ट क्र. ९२१/०७ वर दर्शविल्याप्रमाणे लांबी ५.२कि.मी. × रुंदी १००मीटर × खोली ९मीटर | | १,६६,३०६ | | | |
| | | **एकूण** | **१० ड्रेझर्स** | **३,६२,२९४** | **१,८५,०००** | **७,३४,४५,०००** | **७३,४४,५००** |
| ३ | रायगड व रत्नागिरी जिल्हयातील सावित्री नदी व बाणकोट खाडीचा संयुक्त रेतीगट | **गट क्र.३ उपगट : दासगाव ते महाड**<br><br>फ) दासगाव ते सव-चार्ट क्र. ९८१/०७ वर दर्शविल्याप्रमाणे लांबी २.६ कि.मी. × रुंदी १००मीटर × खोली ५ मीटर<br><br>ग) सव ते महाड -चार्ट क्र. ९८०/०७ वर दर्शविल्याप्रमाणे लांबी ३.४ कि.मी. × रुंदी १००मीटर × खोली ५ मीटर | ६.०० कि.मी. करीता ६ संक्शन पंप | १,६१,०४२<br><br>८५,९९० | १,२५,४३० | ४,३२,७३,३५० | ४३,२७,३३५ |
| | एकूण | | ६ सक्शन पंप | २,४७,०३२ | १,२५,४३० | ४,३२,७३,३५० | ४३,२७,३३५ |

अ) रेती गटात रेती उत्खनन करण्याचा कालावधी रेतीगटाचा ताबा घेतल्यापासून दिनांक ३१/०७/२०१० पर्यत राहिल व कोणत्याही कारणास्तव कोणत्याही स्वरुपाची मुदतवाढ देण्यांत येणार नाही.

ब) १) उपरोक्त तीनही रेती गटाच्या लिलावाचे निविदेचे कोरे नमुने / लिलावात भाग घेण्यासाठीच्या अर्जाचे नमुने लिलावाच्या अटी / शर्तीसह स्वतंत्रपणे रक्कम रु.१०००.०० रोख प्रत्येकी जमा केल्यावर विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, १ ला मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ तसेच जिल्हाधिकारी रायगड व जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालयात लिलाव जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ते दिनांक २७/१/२०१० पर्यत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील.

**२) उपरोक्त तीन्ही रेती गटाच्या लिलावासाठीचा अर्ज व निविदा प्रत्येक गटासाठी स्वतंत्रपणे भरणे बंधनकारक राहील.**

क) उपरोक्त रेती गटाच्या लिलावात भाग घेवू इच्छिणा-या व निविदा भरु इच्छिणा-या व्यक्ती, संस्था यांनी वरील तक्त्यातील रकाना क्र ७ मध्ये दर्शविल्या प्रमाणे होणारी बयाणाची रक्कम लिलाव जाहिर झाल्याच्या दिनांकापासून ते दि. २७/१/२०१० पर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत निविदा सादर करताना/लिलावात भाग घेण्याबद्दल अर्ज सादर करतांना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या नांवे काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेवर काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल.

ड) उपरोक्त संबंधित गटाच्या परिपूर्ण भरलेल्या मोहोरबंद निविदा / लिलावात भाग घेण्याचा अर्ज तसेच बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टव्दारे विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे नावे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, १ ला मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे लिलाव जाहिर झाल्याच्या दिनांकापासून ते दिनांक २७/०१/२०१० पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यन्त विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांच्या वतीने उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग किंवा चिटणीस, महसूल शाखा, विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालयात तसेच जिल्हाधिकारी रायगड व जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालयात संबंधीत निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड व रत्नागिरी हे निविदा/अर्ज स्विकारतील. **दिनांक २७/०१/२०१० रोजी दुपारी ३.०० नंतर निविदा/ लिलावात भाग घेण्याचा अर्ज / बयाणा रक्कम स्विकारली जाणार नाही.**

इ) मोहोरबंद निविदा भरणा-या व्यक्ती / संस्था यांना खुल्या लिलावातही भाग घेता येईल.

फ) दिनांक २८/०१/२०१० रोजी खुल्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी व त्याच वेळी मोहोरबंद निविदा उघडण्यात येतील व खुला लिलाव व मोहोरबंद निविदा यामध्ये जी जास्त रक्कम येईल त्याच्या नांवे निविदेतील नमूद अटी व शर्तीच्या आधिन राहून लिलाव अंतिम करण्यात येईल.

ग ) ज्या व्यक्तीच्या नांवे लिलाव / निविदा अंतिम करण्यात येईल त्याला देकाराच्या रकमेच्या १/४ रक्कम त्याच दिवशी डिमांड ड्राफ्ट / राष्ट्रीय कृत बँकेवर काढलेल्या धनादेशाव्दारे लिलावाच्या दिवशी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडे जमा करावी लागेल. जर देकाराच्या रकमेच्या १/४ रक्कम लिलावधारकाने त्याच दिवशी शासन जमा केली नाही तर त्यांनी भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व त्यांचे नांवे मंजूर केलेला लिलाव /निविदा रद्द करण्यात येईल.

ह) ज्याच्या नावे लिलाव मंजूर करण्यात येईल त्याला उत्खनन क्षेत्राच्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी निश्चित केलेल्या गट निहाय सर्वेक्षण शुल्काची रक्कम गट क्र.१ करीता रक्कम रु.९,७०,६४०/-, गट क्र.२ करीता रक्कम रु.५,२९,४४०/- व गट क्र.३ करीता रक्कम रु.१,४१,१८४/- **महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड** यांच्या नावे काढलेल्या धनादेश किंवा डिमांड ड्राफ्टव्दारे लिलावाच्या दिवशी जमा करावी लागेल.

ज) १) निविदेसोबत जोडण्यांत आलेल्या महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाने उत्खननासाठी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रा बाबतचे परिशिष्ट १ मधील तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय यांचेकडील ना हरकत प्रमणपत्रामध्ये परिशिष्ट २ मधील अटी व शर्ती लिलाव/ निविदा धारकांवर बंधनकारक असतील व त्याप्रमाणे आवश्यक त्या पूर्व परवानग्या यशस्वी लिलाव धारकांना घेणे बंधनकारक राहील.

२) तसेच ज्याच्या नावे लिलाव मंजूर करण्यात येईल त्याला त्या गटाकरीता उपलब्ध कालावधीकरिता अनुज्ञेय साठयाचा उत्खनन करता येईल. त्यापेक्षा अधिक साठा उत्खनन करता येणार नाही. ( रेतीगटाच्या तपशीलात नमुद केलेला कॉलम ५अ )

ल) लिलाव स्विकारणे तहकूब करणे अथवा रदद करणे किंवा लिलावाचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही बाबतचा अंतिम निर्णयाचे अधिकार विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडे राखून ठेवण्यांत आले आहेत.

लिलाव गटाचा तपशील लिलावाच्या अटी व शर्ती उत्खननासाठी राखीव क्षेत्राची माहिती व महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाने उत्खननासाठी दर्शविलेल्या क्षेत्राचे नकाशे इत्यादि माहिती विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, १ ला मजला , बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे तसेच जिल्हाधिकारी, रायगड व रत्नागिरी यांच्या कार्यालयातील खनिकर्म शाखेत कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

(एस.एस.संधू)
विभागीय आयुक्त,कोकण विभाग

टिपः- रेती लिलाव जाहिरनामा व इतर अटी शर्ती www. raigad.gov.in व www. ratnagiri .gov.in या संकेत स्थळावर पहायला उपलब्ध होतील.